सत्यमेव जयते

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन -२०२५
जिल्हा - वाशिम

जिल्हयातील प्रमुख पीक सोयाबीन

काळविट अभयारण्य, कारंजा

कृषी विज्ञान केंद्र, करडा

पद्मतीर्थ तलाव वाशिम

MAHA DES

अर्थ व सांख्यिकी संचालनालय
नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

जिल्हा
सामाजिक व आर्थिक समालोचन
२०२५

जिल्हा - वाशिम

अर्थ व सांख्यिकी संचालनालय
महाराष्ट्र शासन

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन-२०२५

- - :: --प्रस्तावना - - :: - -

वाशिम जिल्हयाच्या नियोजनाला, विकास कामासाठी व भविष्यातील विकासाचा अंदाज करण्यासाठी उपयोगी असणारी सांख्यिकीय आकडेवारी गोळा करुन जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - २०२५ हे प्रकाशन जिल्हा सांख्यिकी कार्यालय, वाशिम या कार्यालयामार्फत पुर्ण करण्यात आले आहे.

प्रकाशनाच्या पहिल्या भागात जिल्ह्याचा समग्र आढावा व आलेख दर्शविले असुन दुसऱ्या भागात जिल्ह्यातील सामाजिक व आर्थिक क्षेत्राच्या स्थितीबाबतची सांख्यिकीय आकडेवारी तक्त्याच्या स्वरुपात दिलेली आहे. तिसऱ्या भागात गणनाविषयक आकडेवारीचा समावेश करण्यात आला आहे. सदर प्रकाशनातील आकडेवारी ही जिल्हयाची स्थिती दर्शविणारी असल्याने या प्रकाशनातील माहितीचा उपयोग विविध शासकीय/निमशासकीय,खाजगी संस्था, विद्यार्थी, संशोधक व नागरिकांना निश्चितपणे होईल अशी अपेक्षा आहे.

जिल्हयातील केंद्र पुरस्कृत योजना, राज्य शासनाच्या योजना, जिल्हास्तरीय सर्वसाधारण योजना, जिल्हा परिषदेकडील योजना, अनुसुचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना इ. योजना राबविण्यासाठी या प्रकाशनातील आकडेवारी ही अत्यंत उपयोगी आहे,अशी माझी खात्री आहे.

सदरील प्रकाशन मा. आयुक्त व मा.संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई आणि मा.सहसंचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय, अमरावती यांच्या मार्गदर्शनानुसार पुर्ण करण्यात आले.

सर्व संबधित यंत्रणांनी प्रकाशनाकरिता उपयुक्त माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळेच सदर प्रकाशन पुर्ण होऊ शकले. त्या करिता मी, जिल्हा सांख्यिकी कार्यालय वाशिम तर्फे सर्वांचा आभारी आहे.

अ.बा.रेठे
(प्र.)उपसंचालक
जिल्हा सांख्यिकी कार्यालय,
वाशिम.

दिनांक : ३ नोव्हेंबर,२०२५

अनुक्रमणिका

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन-२०२५

जिल्हा-वाशिम

तक्ता क्र.	विषय	पृष्ठ क्र.
	भाग १ - समालोचन	
	१. जिल्ह्याचा समग्र आढावा	११-२५
	२. दृष्टिक्षेपात जिल्हा	२६-३३
	३. जिल्हा योजनेचा आढावा	३४-३५
	४. जिल्ह्याचा नकाशा	३६
	५. निवडक निर्देशकांवर आधारित आलेख	३७-३९
	भाग २ - सांख्यिकीय तक्ते	४०-४१
१	**निवडक निर्देशक**	४२
१.१ अ	जिल्ह्यातील विविध आर्थिक व सामाजिक बाबींचे निवडक निर्देशक	४३
१.१ ब	जिल्ह्यातील विविध आर्थिक व सामाजिक बाबींचे निवडक निर्देशक	४४-४५
१.१ क	जिल्ह्यातील विविध आर्थिक व सामाजिक बाबींचे निवडक निर्देशक	४६-४७
१.२	जिल्ह्यातील महत्वाची सांख्यिकी	४८-४९
२	**जिल्हा उत्पन्न अंदाज**	५०
२.१	क्षेत्रवार स्थूल जिल्हा उत्पन्न - चालू किंमतींनुसार	५१-५३
२.२	क्षेत्रवार निव्वळ जिल्हा उत्पन्न- चालू किंमतींनुसार	५४-५६
२.३	क्षेत्रवार स्थूल जिल्हा उत्पन्न –स्थिर (२०११-१२) किंमतीनुसार	५७-५९
२.४	क्षेत्रवार निव्वळ जिल्हा उत्पन्न –स्थिर (२०११-१२) किंमतीनुसार	६०-६२
३	**किंमती व सार्वजनिक वितरण व्यवस्था**	६३
	किंमती विषयक आकडेवारी	
३.१	जिल्ह्यातील महत्वाच्या वस्तुंच्या केंद्रनिहाय त्रैमासिक सरासरी किरकोळ किंमती	६४-६५
	सार्वजनीक वितरण व्यवस्था	
३.२	रास्त भाव धान्य दुकाने,शिधापत्रिका धारकांची संख्या व गोदामांची संख्या	६६-६७
३.३	अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य गटात मोडणाऱ्या (अंत्योदय अन्न योजना वगळून) कुटुंबांसाठी अन्नधान्याचे नियतन व उचल	६८
४	**जमीन व इतर महसूल, स्थानिक स्वराज्य संस्थांचे उत्पन्न/खर्च, बँकिंग, विमा व बचत गट**	६९
	जमीन व इतर महसूल	
४.१ (अ)	शासकीय कर व इतर यांची वसूली / थकबाकी- जमिन महसूल (सर्वसाधारण, वाढीव, संकिर्ण), सेस (उपकर-जि.प., ग्रा.प., पं.स., इ.जी.एस.) शिक्षण कर, अकृषीक आकारणी, सिटी सर्वे (पोट हिस्सा फाळणी फी), वस्तीवाढ सनद फी, अंतर्गत लेखा परिक्षण वसूली व नझूल बाकी.	७०
४.१ (ब)	शासकीय कर व इतर यांची वसूली/थकबाकी (खाणी, गौणखनिज रॉयल्टी, मत्स्यव्यवसाय कर,कोर्ट फी व मुद्रांक शुल्क, नोंदणीपत्र फी, बीएडीआर व बीबीआर कायद्यानुसार मिळणाऱ्या रकमा, महसूल प्रमाणपत्राव्दारे होणारी वसूली, करमणूक, जाहिरात कर इ.	७१

४.१ (क)	शासकीय कर व इतर यांची वसूली/थकबाकी-(सर्व साधारण तगाई, मृद संधारण थकबाकी, वन जमिनीवरील भूमीहीन शेतमजुरांना पुनर्वसनासाठी दिलेले कर्ज, अकृषीक कर्ज,आदर्श गृहनिर्माण कर्ज, इतर देशाकडून आलेल्या निर्वासितांना दिलेली कर्जे, प्रकल्पग्रस्तांना आणि कुळांना दिलेले कर्ज, नैसर्गिक आपत्ती कर्ज, जमिन सुधारणा - कब्जेहक्क किंमती इत्यादी)	७२
	स्थानिक स्वराज्य संस्थांचे उत्पन्न/खर्च	
४.२	नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे २०२४-२५ मधील उत्पन्न व खर्च	७३
४.३	ग्रामपंचायतींचे उत्पन्न व खर्च	७४
४.४	जिल्हा परिषदचे उत्पन्न व खर्च	७५
	बँक व विमा	
४.५	तालुकानिहाय बँक कार्यालये, वर्गीकृत बँकांची संख्या,जि.म.स.बँकाच्या ठेवी व कर्जे	७६
	बचत गट	
४.६	जिल्ह्यातील बचत गटांबाबतची माहिती	७७-७९
५	**कृषी व संलग्न सेवा**	८०
	कृषी	
५.१	जमिनीच्या वापराविषयी माहिती	८१
५.२	निरनिराळ्या पिकांखालील क्षेत्र	८२-८९
५.३	जिल्ह्यात वितरीत करण्यात आलेले बियाणे	९०
५.४	रासायनिक खतांचा वापर	९१
५.५	निरनिराळ्या पिकांची प्रति हेक्टरी उत्पादकता	९२-९३
५.६	मुख्य पिकांचे दर हेक्टरी अंदाजित उत्पादन	९४-९५
५.७	तालुकानिहाय पर्जन्य दिवसांची संख्या व एकूण पर्जन्य	९६
	पदुम	९७
५.८	कृत्रिम रेतन व दुग्ध उत्पादनाची तालुकानिहाय प्रगती	९८-९९
५.९	पशुवैद्यकीय संस्थांबाबतची माहिती	१००
५.१०	भूजल मत्स्यव्यवसाय विषयक माहिती	१०१
५.११	सागरी मत्स्यव्यवसाय विषयक माहिती	१०२
५.१२	शासकीय आणि सहकारी दुग्ध शाळांमधील दुग्ध उपउत्पादने	१०३
५.१३	दुग्ध विकास सहकारी संस्थांबाबतची माहिती	१०४
	जलसंपदा व लाभ क्षेत्र	१०५
५.१४	जिल्ह्यातील सिंचनाच्या व पाणी उपसा करण्याच्या सोयी	१०६
५.१५	विविध साधनांखालील ओलिताचे क्षेत्र	१०७
५.१६	तक्ता वगळण्यात आला आहे.	-
५.१७	कूपनलिका, हातपंप व विद्युत पंपांविषयी माहिती	१०८
५.१८	जिल्ह्यातील पाटबंधारे विषयक सुविधा (राज्यस्तर पाटबंधारे)	१०९
५.१९	जिल्ह्यातील लघुपाटबंधा-यांच्या कामाविषयक माहिती	११०

५.२०	मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्पांविषयी माहिती	१११
५.२१	जिल्हयातील पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत मृद व जलसंधारण कामांची प्रगती	११२
५.२२	जिल्हयातील जलयुक्तशिवार अभियानाबाबतची माहिती	११३
	वने व पर्यावरण	११४
५.२३	जिल्ह्यातील एकूण वनक्षेत्र	११५
५.२४	जिल्ह्यातील वनांचे वर्गीकरण	११६
५.२५	सामाजिक वनीकरण कार्यक्रमांतर्गत वृक्षरोपणाचे लक्ष्य व साध्य	११७
५.२६	वन्यजीव व राष्ट्रीय उद्याने / अभयारण्याअंतर्गत प्रकल्पनिहाय क्षेत्र व खर्च	११८
५.२७	मुख्य व गौण वन उत्पादने व उत्पन्नाविषयी माहिती	११९
५.२८	संवर्गनिहाय कारखान्यांचा तपशील	१२०
६	**उद्योग व सहकार**	१२१
	उद्योग	
६.१	जिल्ह्यातील उद्योगांबाबतचा तपशील	१२२-१२३
६.१(अ)	जिल्ह्यातील तालुकानिहाय उद्योग आधार असलेले सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमाची माहिती	१२४
६.२	जिल्ह्यातील विविध यंत्रणांकडे उपलब्ध असलेल्या स्वयंरोजगाराच्या योजनांतर्गत लाभ दिलेल्या लाभधारकांची संख्या	१२५
	रोजगार व स्वयंरोजगार	१२६
६.३	कारखान्यातील कामगारांची दैनिक सरासरी संख्या	१२७
६.४	कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राबाबतची सांख्यिकी	१२८
६.५	शासकीय कर्मचाऱ्यांचा सर्वंकष माहितीकोष अंतर्गत शासकीय कर्मचाऱ्यांची संख्या	१२९
६.६	निरनिराळया उद्योगांतील रोजगारांबाबतची माहिती	१३०
	कामगार	१३१
६.७	दुकाने, व्यापारी संस्था व त्यातील कामगारांबाबतची माहिती	१३२
	सहकार	१३३
६.८	प्राथमिक कृषि सहकारी संस्थांचे कार्य	१३४-१३५
६.९	प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्थांचा तपशील	१३६
६.१०	जिल्ह्यातील साखर कारखाने विषयक माहिती	१३७
६.११	विविध प्रकारच्या सहकारी संस्थांचा तपशील	१३८-१३९
६.१२	सहकारी संस्थांची लेखापरीक्षण वर्गाप्रमाणे संख्या	१४०
६.१३	जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या सहकारी बँकाचे कार्य	१४१
६.१४	बिगर-कृषी सहकारी पतसंस्थांचे कार्य	१४२
६.१५	परवानाधारक सावकारांची संख्या आणि त्यांनी दिलेली कर्जे	१४३
	पणन	१४४
६.१६	जिल्हा आणि प्राथमिक पणन संस्थांचे कार्य	१४५
६.१७	नियंत्रित बाजारपेठांतील कृषी मालांची वार्षिक आवक	१४६-१४७

६.१८	निवडक कृषि मालाच्या त्रैमासिक सरासरी घाऊक किमंती	१४८
	वस्त्रोद्योग	१४९
६.१९	सहकारी सूत गिरण्या, हातमाग व यंत्रमाग यांचा तपशील	१५०
७	**पायाभूत सुविधा**	
	उर्जा	१५१
७.१	जिल्ह्यातील विजेचा वापर	१५२
	प्रादेशिक परिवहन व महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन व दळणवळण	१५३
७.२	मोटार वाहनांची संख्या	१५४
७.२(अ)	अनुज्ञाप्ती धारकांची संख्या	१५५
७.३	महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची प्रवासी वाहतूक	१५६
७.४	स्थानिक स्वराज्य संस्थांचे वाहतूक उपक्रम	१५७
७.५	पोस्ट आणि दूरध्वनी सेवा यांची आकडेवारी	१५८
	सार्वजनिक बांधकाम	१५९
७.६	प्रकार व पृष्ठभाग यानुसार रस्त्यांची लांबी	१६०
७.७	जिल्ह्यातील रस्ते विकास कार्यक्रमाची प्रगती	१६१
७.८	तालुक्यातील रस्तेविषयक आकडेवारी (आदिवासी + बिगर आदिवासी क्षेत्र)	१६२
	पाणी पुरवठा व स्वच्छता	१६३
७.९	पिण्याच्या पाण्याच्या सोयी व टंचाई संबंधी केलेल्या उपाययोजना	१६४-१६५
७.१०	अनुसूचित जाती व नवबौध्द वैयक्तिक नळजोडणी	१६६
७.११	ग्रामीण भागात शौचालयाची सुविधा असणाऱ्या कुटूंबांची संख्या	१६७
८	**सामाजीक क्षेत्रे व सामूहिक सेवा**	
	शिक्षण	१६८
८.१	जिल्ह्यातील प्राथमिक शाळांबाबतची माहिती	१६९-१७१
८.२	जिल्ह्यातील माध्यमिक शाळांबाबतची माहिती	१७२-१७४
८.३	जिल्ह्यातील उच्च माध्यमिक शाळांबाबतची माहिती	१७५-१७७
८.४	शैक्षणिक संस्थांतील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची संख्या	१७८-१७९
८.५	शैक्षणिक संस्थांतील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची संख्या	१८०-१८१
८.६	शैक्षणिक संस्थांतील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची संख्या	१८२-१८३
८.७	जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण	१८४
८.८	इयत्तानिहाय विद्यार्थ्यांची संख्या	१८५
८.९	प्राथमिक शाळांतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांची संख्या	१८६
८.१०	प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण	१८७
८.११	शारीरिक शिक्षण महाविद्यालये, क्रीडांगणे, क्रीडा संस्था आणि क्रीडा शिष्यवृत्तीधारक याबाबतची माहिती	१८८

८.१२	इयत्ता दहावी नंतर विविध क्षेत्रातील संस्था संख्या ,उपलब्ध प्रवेश क्षमता व प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांची संख्या	१८९-१९०
८.१३	जिल्ह्यातील महाविद्यालयांबाबतची माहिती	१९१-१९२
८.१४	व्यावसायिक शिक्षण संस्थां	१९३
	सार्वजनिक आरोग्य	१९४
८.१५	सार्वजनिक व शासन सहाय्यीत वैद्यकीय सुविधांची माहिती	१९५
८.१५-अ	कोविड-१९ बाधित रुग्णांसाठी उपलब्ध उपचार सुविधा	१९६
८.१६	खाजगी वैद्यकीय सुविधांची माहिती	१९७
८.१७	जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थापन माहिती प्रणाली अंतर्गत जन्म व मृत्यूंची संख्या	१९८
८.१८	जिल्ह्यातील प्रसुतीपूर्व तपासणींची संख्या	१९९
८.१९	विविध कारणांनुसार मृत्यूची संख्या	२००
८.२०	माता व बाल संगोपन कार्यक्रमांतर्गत लस टोचणी	२०१
८.२१	कुटुंब कल्याण कार्यक्रमाची प्रगती	२०२
	महिला व बालविकास	२०३
८.२२	जिल्ह्यातील कार्यरत अंगणवाड्या, कार्यरत सेविका व अंगणवाड्या इमारतींचा तपशिल	२०४
८.२३	जिल्ह्यातील कार्यरत अंगणवाड्या व त्यामधील बालके	२०५-२०६
८.२४	जिल्ह्यातील कार्यरत अंगणवाड्यांमधील कुपोषीत बालकांचे श्रेणीनिहाय वर्गीकरण	२०७
८.२५	एकात्मिक बाल विकास सेवा योजना - माता व बालसंगोपन	२०८
	गृहनिर्माण	२०९
८.२६	सिडकोने / म्हाडाने बांधलेल्या घरांचा तपशिल	२१०
८.२७	प्रधानमंत्री आवास योजना	२११-२१२
८.२८	घरबांधणीसाठी अर्थसहाय्य योजनेअंतर्गत ग्रामीण क्षेत्रात दिलेली घरे	२१३-२१५
	सामाजिक न्याय	२१६
८.२९	जिल्ह्यातील मागासवर्गीय वसतीगृहे, त्यांची प्रवेश क्षमता व दिलेले प्रवेश	२१७
८.३०	जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्त्या, त्यामधील लोकसंख्या व अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्त्यांची सुधारणा	२१८
	अल्पसंख्यांक विकास	२१९
८.३१	अल्पसंख्यांक विकास विभागाकडून राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांमधील लाभार्थी संख्या	२२०
	विशेष सहाय्य	२२१
८.३२	महसुल विभागाकडील सामाजिक सुरक्षा योजनांतर्गत केलेले अर्थसाहाय्याबाबतची माहिती	२२२

८.३३	संजय गांधी निराधारअनुदान योजनेंतर्गत केलेले अर्थसाहाय्याबाबतची माहिती	२२३
	मदत व पुनर्वसन	२२४
८.३४	पुनर्वसन प्रकल्पांची सद्यस्थिती	२२५
८.३५	जिल्ह्यातील दुष्काळामुळे झालेली हानी व पुनर्वसन व्यवस्थापनांतर्गत दिलेले सहाय्य	२२६
८.३६	जिल्ह्यातील आपत्तीमुळे झालेली हानी व आपत्ती व्यवस्थापनांतर्गत दिलेले सहाय्य	२२७
९	**योजनाविषयक आकडेवारी**	
	विविध विकास योजना	२२८
९.१	जिल्हा नियोजन समिती अंतर्गत विविध योजनांतर्गत नियतव्यय, प्राप्त निधी व खर्चाचा आढावा	२२९
९.२	विविध विकास शीर्षाखाली झालेला योजनांतर्गत खर्च	२३०-२३३
९.३	वीस कलमी कार्यक्रमाची भौतिक प्रगती	२३४-२३५
९.४	केंद्र शासनाच्या महत्वपुर्ण योजनांची प्रगती	२३६-२३७
९.५(अ)	खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम (लोकसभा मतदार संघ) - (I) १७ वी लोकसभा)	२३८
९.५(ब)	खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम (लोकसभा मतदार संघ) - (I) १८ वी लोकसभा	२३९
९.५(क)	खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम (राज्यसभा सदस्य) - (I) राज्यसभा मागील वर्ष	२४०
९.५(ड)	खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम (राज्यसभा सदस्य) - (II) राज्यसभा - अहवाल वर्ष	२४१
९.६	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम (विधानसभा मतदार संघ)	२४२
९.७	स्थानिक विकास कार्यक्रम (विधानपरिषद सदस्य)	२४३-२४४
	महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना	२४५
९.८	महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेची जिल्ह्यातील प्रगती	२४६
९.९	महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत दिलेला रोजगार	२४७
९.१०	महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली घेतलेली कामे, त्यावरील रोजगार व खर्च	२४८
९.११	महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली घेण्यात आलेली प्रकारानुसार कामे व त्यावरील खर्च	२४९
१०	**संकीर्ण**	
	न्याय व प्रशासन	२५०
१०.१	पोलिस अधिकारी/कर्मचारी यांची संख्या	२५१
१०.१(अ)	अत्याचार झालेल्या महिलांबाबत नोंदविलेल्या गुन्ह्यांची संख्या	२५२
१०.१(ब)	अत्याचार झालेल्या बालकांबाबत नोंदविलेल्या गुन्ह्यांची संख्या	२५३
१०.२	जिल्ह्यात कार्यरत विविध न्यायालये, त्यामधील न्यायाधीशांची संख्या व निकालात काढलेली प्रकरणे	२५४
	माहिती व जनसंपर्क	२५५
१०.३	जिल्ह्यात प्रकाशित झालेली वर्तमानपत्रे व नियतकालिके	२५६
१०.४	चित्रपट गृहे, व्ही.डी.ओ. केंद्र आणि केबलधारक यांची आकडेवारी	२५७
	निवडणूकीबाबत	२५८
१०.५	लोकसभा निवडणूकीबाबतची आकडेवारी	२५९
१०.५(अ)	विधानसभा निवडणूकीबाबतची आकडेवारी	२६०

	वित्त	२६१
१०.६	जिल्ह्यात गोळा करण्यात आलेला कर महसूल	२६२
१०.७	जिल्ह्यात गोळा करण्यात आलेला कायदेनिहाय जमा महसूल (मूल्यवर्धित कर आणि वस्तू व सेवा कर)	२६३
१०.८	कोषागारात सादर झालेल्या देयकांचे तपशिल	२६४
	पर्यटन	२६५
१०.९	जिल्हयातील पर्यटन स्थळाच्या विकासाबाबत सद्यस्थिती	२६६
	भाग -३ गणनाविषयक आकडेवारी	२६७-२८६
	जनगणना (लोकसंख्या)	
११.१	लोकसंख्या विषयक निवडक आकडेवारी	२६८-२६९
११.२	जिल्ह्यातील मागासवर्गीयांची लोकसंख्या	२७०
११.३	लोकसंख्या आणि वृद्धिदर	२७१
११.४	शहरांची वर्गवारी आणि त्यांची लोकसंख्या	२७२
११.५	मुख्य व सीमांतीक काम करणाऱ्यांचे उद्योग गटनिहाय वर्गीकरण	२७३
११.६	धर्म व वयोगटानुसार लोकसंख्या	२७४
	कृषी गणना	२७५
११.७	वहिती धारणेचा प्रकार आणि क्षेत्रफळ गटानुसार वर्गीकरण	२७६
	पशुगणना	२७७
११.८ (अ)	जिल्ह्यातील पशुधन (गाई व बैल)	२७८-२८०
११.८ (ब)	जिल्ह्यातील पशुधन(म्हशी व रेडे)	२८१
११.८ (क)	जिल्ह्यातील एकूण पशुधन	२८२
११.८ (ड)	जिल्ह्यातील एकूण कुक्कुटपक्षी	२८३
	आर्थिक गणना	२८४
११.९	कृषी व बिगर-कृषी उद्योग	२८५
११.१०	प्रमुख उद्योग गटानुसार उद्योगांची आणि नियमित काम करणा-या कामगारांची संख्या	२८६
	ऐतिहासिक पर्यटन व तीर्थक्षेत्र	२८७

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन-२०२५

भाग-१

समालोचन

भाग - १

जिल्ह्याचा समग्र आढावा

जिल्ह्याचा समग्र आढावा

जिल्हा - वाशिम

१. स्थानिक व भौगोलिक वैशिष्टे

१.१ भौगोलिक स्थाने

वाशिम जिल्हा हा महाराष्ट्र राज्याच्या मध्ये पूर्वे कडे वसलेला असुन हा जिल्हा उत्तर अक्षांश १९° ६१' ते २१° १६' आणि रेखांश ७६° ७' ते ७७° १४' अंशाचे दरम्यान पसरलेला आहे. या जिल्हयाच्या उत्तरेला अकोला जिल्हयातील पातूर तहसिल व पूर्वेस यवतमाळ जिल्हयातील दारव्हा तहसिल असुन दक्षिणेस यवतमाळ जिल्हयातील पुसद तहसिल व मराठवाडयातील हिंगोली जिल्हा आहे. पश्चिमेस बुलडाणा जिल्हयातील लोणार व मेहकर हे तहसिल आहे.

१.२ क्षेत्र व प्रशासकिय विभाग.

वाशिम जिल्हयाचे क्षेत्रफळ ४९०१.१९ चौ.कि.मी. असून ते महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रफळाच्या १.५९ टक्के एवढे आहे. १ जुलै १९९८ पासून या जिल्हयाची नव्यानेच निर्मिती झालेली असुन पुर्वीच्या अकोला या जिल्हयातील वाशिम,मानोरा,मंगरुळपिर,रिसोड,कारंजा, व मालेगांव हे सहा तहसिल जिल्हयात समाविष्ट आहे करण्यात आलेले आहे. तसेच या जिल्हयामध्ये २०११ च्या जनगणने प्रमाणे ४ नगर पालीका असुन ६ पंचायत समित्या व ७८९ एकुण खेडी आहेत.जिल्हयाचे मुख्यालय वाशिम येथे आहे.

१.३ नैसर्गिक रचना.

जिल्ह्याचा मध्य भाग हा सपाट असुन अजिंठा पर्वताचा काही भाग मालेगांव तालुक्यात आहे. तसेच दक्षिणेला पैनगंगा नदी असुन ती दक्षिण भागाकडे रिसोड तालुक्यातुन वहात जाऊन पुढे गोदावरी नदीला मिळते. या नदीच्या खो-याला बालाघाट असे म्हणतात. वाशिम जिल्हयाची समुद्र सपाटी पासुन उंची ३३५ ते ५६७ मिटर दरम्यान आहे.

भूगर्भीय रचना

वाशिम जिल्हयाचे क्षेत्र मुख्यत: दख्खन बस्तर लाव्हा या प्रकारच्या खडक प्रकारात येते. पुर्णपणे बेसॉल्टने आच्छादित हा प्रदेश काही ठिकाणी अविघटीत तर काही ठिकाणी व्हेसिक्युअर झिओलिटिक प्रस्तराची झिज होऊन भेगा पडुन झालेल्या सछिद्रतेमुळे भुजल साठा होण्यास मदत होत असल्यामुळे अशा जमिनीला सुपीक जमीन असे समजतात. वाशिम जिल्हयाच्या भुगर्भामध्ये विशेष उल्लेख करण्यासारखी खनिजे किंवा त्यासारखे पदार्थ आढळून येत नाहीत.

१.४ नदयांची रचना

वाशिम जिल्हयाचे क्षेत्र हे वाहक क्षेत्र (रन ऑफ झोन) मध्ये येत असून पाण्याचे वहन वाशिम वरुन बाहेरच्या दिशेने आहे. या जिल्हयातील महत्वाच्या नदया पैनगंगा,काटेपूर्णा ,मोरणा, अडाण, अरुणवती, बेंबळा या आहेत. पैनगंगा ही सर्वात मोठी नदी असून तिचे जिल्हयात सर्वात जास्त पाणी आहे, व ती प्रामुख्याने रिसोड व वाशिम तालुक्यातून वाहते. रिसोड च्या वायव्य दिशेने वाहून येणारी पैनगंगा वाशिम तालुक्याच्या दक्षिण सिमेवरुन पुढे वाहते, तसेच मंगरुळपीर व मानोरा या तालुक्याच्या उंचपठारी भागातून अरुणावती नदीचा उगम आहे, जी पश्चिमे कडून पुर्वे कडे वाहते. वाशिम जिल्हयाच्या उंच पठारी भागातून काटेपूर्णा, पूस व चंद्रभागा नदयांचा उगम आहे. मालेगांव येथील उंच डोंगराळ भागातून मोरणा नदीचा उगम आहे, ती दक्षिणे कडुन उत्तरेकडे वाहते व पूढे अकोला जिल्हयात जाते. मालेगांव व मंगरुळपीर तालुक्यातून वाहणारी अडाण नदी पुढे यवतमाळ जिल्हयात जाते.कारंजा तालुक्यातून वाहणारे छोटे छोटे पाण वहळ उत्तरे कडे पूर्णा व पुर्वेकडे वर्धा नदीला जाऊन मिळतात. वाशिम जिल्हयात लहान व मोठया नदयांचे जाळे असले तरी देखिल पाणी उपलब्धतेच्या दृष्टीकोनातुन जिल्हयाच्या काही भागातच पाणी उपलब्ध आहे. जिल्हयातील बहुतांश क्षेत्र हे वाहक क्षेत्र (रन ऑफ झोन) असल्यामुळे जमिनीत पाणी मुरण्यास अतिशय कमी वाव आहे.

१.५ हवामान व पर्जन्यमान

जिल्हयातील हवामान साधारणत: विषम आहे.उन्हाळा फार कडक असून साधारण मे महिन्यात उष्ण तापमान ४५ ते ४८ सेंटीग्रेड पर्यंत असते. तसेच हिवाळयात मात्र उष्ण तापमानात घट होऊन साधारणत: डिसेंबर महिन्यामध्ये सर्वात कमी म्हणजे ८ ते १० सेंटीग्रेड पर्यंत असते. उन्हाळयात उष्ण तापमान जास्त चढत असले तरी रात्री वातावरण चांगले थंड होते. जिल्हयातील सरासरी पर्जन्यमान साधारणपणे ९००.२० मि.मि.आहे. जिल्हयात २०२४-२५ मध्ये वाशिम केंद्रावर सर्वात जास्त म्हणजे १०१७.६० मि.मि.तर कारंजा केंद्रावर सर्वात कमी ८३३.६६ मि.मि.पर्जन्यमानाची नोंद झाली.

१.६ जमीन

वाशिम जिल्हयातील जमीन मुख्यत: जमिनीच्या ३ प्रकारात मोडतो. १) मध्यम काळी जमीन २) काळी कसदार जमीन ३) हलकी व खडकाची जमीन, जिल्हयाच्या मध्यभागी काळी कसदार जमीन असून जिल्हयाच्या आजुबाजुला मध्यम स्वरुपाची व हलक्या प्रतीची जमीन आहे.

(२) लोकसंख्या

२.१ २०११ च्या जनगणने नुसार लोकसंख्या

२००१ च्या जनगणनेनुसार जिल्हयाची एकूण लोकसंख्या १०,२०,२१६ एवढी आहे.त्यामध्ये पुरुष ५,२६,०९४ व ४,९४,१२२ स्त्रिया आहेत. तर २०११ च्या जनगणने नुसार जिल्हयाची एकूण लोकसंख्या

११,९७,१६० एवढी आहे. त्यामध्ये पुरुष ६,२०,३०२ व ५,७६,८५८ स्त्रिया आहेत. ही लोकसंख्या महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या १.०६ टक्के आहे.

२.२ लोकसंख्येची घनता

२००१ च्या जनगणनेनुसार दर चौ.कि.मी.मध्ये या जिल्हयातील लोकसंख्येची घनता १९६ इतकी होती.. २०११ च्या स्थायी जनगणनेनुसार जिल्हयाचे क्षेत्रफळ ४९०१.१९ चौ.कि.मी.असुन एकुण लोकसंख्या ११,९७,१६० इतकी आहे. दर चौ.कि.मी.मध्ये या जिल्हयातील लोकसंख्येची घनता २४४ इतकी आहे.

२.३ ग्रामीण व नागरी लोकसंख्येचे प्रमाण .

२००१ च्या जनगणनेनुसार वाशिम जिल्हयाची लोकसंख्या १०,२०,२१६ एवढी आहे, त्यापैकी ग्रामीण लोकसंख्या ८,४१,७७१ व नागरी लोकसंख्या १,७८,४४५ एवढी आहे. तर २०११ च्या जनगणनेनुसार वाशिम जिल्हयाची लोकसंख्या ११,९७,१६० एवढी आहे, त्यापैकी ग्रामीण लोकसंख्या ९,८५,७४७ व नागरी लोकसंख्या २,११,४१३ एवढी आहे त्याअनुषंगाने ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण ८२.३४ % व नागरी लोकसंख्यचे प्रमाण १७.६५ % इतके आहे.

२.४ स्त्री- पुरुष प्रमाण

२००१ च्या जनगणनेनुसार या जिल्हयात दर हजारी पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण ९३९ इतके होते . तर २०११ च्या जनगणने नुसार या जिल्हयात दर हजारी पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण ९३० इतके आहे. तर राज्यामध्ये हेच प्रमाण ९२९ स्त्रिया एवढे आहे.

२.५ अनुसुचित जाती जमाती.

२०११ च्या जनगणने नुसार वाशिम जिल्हयातील अनुसुचित जातीची लोकसंख्या २,२९,४६२ असुन अनुसुचित जमातीची लोकसंख्या ८०,४७१ आहे. त्याच प्रमाणे अनुसुचित जाती व जमातीचे एकुण लोकसंख्येशी प्रमाण अनुक्रमे १९.१७ % व ६.७२% आहे. महाराष्ट्र राज्याचे हेच प्रमाण अनुक्रमे ११.८१% व ९.३५% असे आहे.

२.६ नागरी व ग्रामीण साक्षरता

२००१ च्या जनगणने प्रमाणे एकुण लोकसंख्येच्या ७३.४० % लोक साक्षर असुन त्यातील ग्रामीण भागात ५७.६०% व नागरी भागातील ८२.४० % होते. २०११ च्या जनगणने प्रमाणे एकुण लोकसंख्येच्या ८३.२५ % लोक साक्षर असुन त्यातील ग्रामीण भागात ८२.१७ % व नागरी भागात ८८.२९ % इतके आहे. स्त्रीया पेक्षा पुरुषाचे साक्षरतेचे प्रमाण जास्त असुन साक्षरतेमध्ये ९०.५५ % पुरुष व ७५.४८% इतके स्त्रिया साक्षर आहेत.

२.७ वापरातील निवासी घरांची व कुटुंबाची संख्या २०११ च्या जनगणनेप्रमाणे

२०११ च्या जनगणनेप्रमाणे वाशिम जिल्हयामध्ये एकुण २,५९,४६४ कुटुंबे आहेत त्यापैकी ८४.१७ टक्के म्हणजे २,१८,४०३ कुटुंबे ग्रामीण भागात तर १५.८२ टक्के म्हणजे ४१,०६१ कुटुंबे नागरी भागातील आहेत.

२.८ लोकसंख्या व मनुष्य बळ

२०११ च्या जनगणनेनुसार काम करणा-या कामगारांची एकुण टक्केवारी ४७.६० % असुन काम करणा-या मध्ये ८३.४५ % कामगार शेतकरी व शेतमजुर होते.

२.९ वयोगटानुसार लोकसंख्येचे वर्गीकरण

वाशिम जिल्हयाची निर्मिती नव्याने झाली असुन सन २०११ च्या जनगणने प्रमाणे लोकसंख्येची वयोगटाप्रमाणे विभागणी केली असता ० ते ६ वर्ष या वयोगटातील लोकसंख्या १२.७१% असून त्यावरील वयोगटातील लोकसंख्या ८७.२९% आहे.

क्षेत्रवार जिल्हा उत्पन्न व दरडोई उत्पन्न

१) चालू किंमती नुसार

सन २०२२-२३ करिता चालू किंमतीनुसार स्थुल जिल्हा उत्पन्न ₹ १७६०६ कोटी ₹ व निव्वळ जिल्हा उत्पन्न १५६०८ कोटी ₹ होते. तर दरडोई स्थुल जिल्हा उत्पन्न १३६०२० कोटी ₹ व दरडोई निव्वळ जिल्हा उत्पन्न १२०५८४ कोटी ₹ होते.

सन २०२३-२४ करिता चालू किंमतीनुसार स्थुल जिल्हा उत्पन्न १९,७६० कोटी ₹ व निव्वळ जिल्हा उत्पन्न १७५२२ कोटी ₹ होते. तर दरडोई स्थुल जिल्हा उत्पन्न १५१९६१ कोटी ₹ व दरडोई निव्वळ जिल्हा उत्पन्न १३४७५४ कोटी ₹ होते.

२) स्थिर किंमती नुसार

सन २०२२-२३ करिता स्थिर किंमतीनुसार स्थुल जिल्हा उत्पन्न रुपये ११०३० कोटी रुपये व निव्वळ जिल्हा उत्पन्न ९७०६ कोटी रुपये होते. तर दरडोई स्थुल जिल्हा उत्पन्न रुपये ८५२१२ व दरडोई निव्वळ जिल्हा उत्पन्न ७४९८९ कोटी रुपये होते.

सन २०२३-२४ करिता स्थिर किंमतीनुसार स्थुल जिल्हा उत्पन्न रुपये ११९२९ कोटी रुपये व निव्वळ जिल्हा उत्पन्न १०४९९ कोटी रुपये होते. तर दरडोई स्थुल जिल्हा उत्पन्न रुपये ९१७३९ व दरडोई निव्वळ जिल्हा उत्पन्न ८०७४५ कोटी रुपये होते.

जिल्हा उत्पन्न अंदाज विषयीच्या मर्यादा

जिल्हास्तरावरील उत्पन्नाचे अचुक अंदाज करण्यासाठी 'प्रदेशाला संचयीत होणारे उत्पन्न' ही संकल्पना वापरणे योग्य असेल तरी, सदर पध्दतीचा वापर करता येत नाही. कारण जिल्हा स्तरावरील आर्थिक

उलाढालीचा परिणाम जिल्ह्यापुरताच मर्यादित राहत नसल्याने संबंधित जिल्ह्याला बाहेरुन प्राप्त होणारे व संबंधित जिल्ह्यातुन बाहेर जाणा-या उत्पन्नाचे मोजमाप करणे शक्य नसते. त्यामुळे उत्पन्न स्त्रोत पध्दती (Income originating approch) या संकल्पनेचा अवलंब करुन जिल्हा स्तरावरील उत्पन्नाचे अंदाज तयार करण्यात आलेले आहेत.

जिल्हा उत्पन्नाचे अंदाज तयार करण्याकरिता लागणारी मुलभुत माहिती अजुनही समाधानकारकरित्या उपलब्ध नाही. प्राथमिक क्षेत्राकरिता बहुतांश आकडेवारी उपलब्ध आहे. मात्र इतर क्षेत्राकरिता आकडेवारी अतिशय अल्पश: प्रमाणात उपलब्ध आहे. ज्या क्षेत्राकरिता जिल्हास्तरावरील आकडेवारी उपलब्ध नाही, त्या क्षेत्राकरिता जिल्हावार अनुरुप असे निर्देशांक वापरुन त्या आधारे राज्यस्तरावरील उत्पन्नाची जिल्ह्यामध्ये विभागणी करण्यात आलेली आहे.

आकडेवारीच्या उपलब्धतेचा अभाव ,अनुरुप निर्देशांकाचा वापर तसेच पद्धतीमधील अंगभुत उणीवा या सर्वांमुळे जिल्हा उत्पन्नाचे अचुक अंदाज बांधण्यामध्ये मर्यादा येत असल्याने हे अंदाज ढोबळमानाने जिल्ह्यातील उत्पन्नाची पातळी आजमाविण्याकरिता वापरावेत. या प्रकाशनात प्रकाशित केलेले जिल्हाउत्पन्नाचे अंदाज वापरताना वरिल मर्यादा लक्षात घ्याव्यात.

३) सार्वजनिक वितरण व्यवस्था

सार्वजनिक वितरण व्यवस्था जिल्हयातील गरीब जनतेला अत्यावश्यक ग्राहक वस्तुचा पुरवठा स्वस्त व अनुदानीत दरात करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने राबविली जाते. केंद्र शासन धान्याचे प्रापण व साठवण करते राज्य सरकार त्यांचे वितरण करते.

यानुसार वितरण व्यवस्था कार्यक्षमपणे राबविण्यासाठी जिल्हयात ७७६ रास्त भावाची दुकाने कार्यरत आहेत. सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत अन्न धान्याची उचल भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून करुन राज्य शासनाच्या मालकीच्या अथवा भाडयाने घेतलेल्या गोदामात केली जाते. यासाठी जिल्हयात १६ शासकीय गोदामे असून गोदामांची क्षमता १२७३० मे.टन आहे. अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य गटात मोडणारे (अंत्योदय अन्न योजना वगळून) योजनेतील कुटुंबाना सन २०२४-२५ वर्षात तांदुळाचे नियतन ०.४७ लाख मे.टन असून उचल ०.४६ लाख मे.टन केलेले आहे. गव्हाचे नियतन ०.१३ लाख मे.टन असून उचल ०.१३ लाख मे.टन केलेली आहे.

जिल्हयातील महत्वाच्या वस्तूंच्या त्रैमासीक सरासरी किरकोळ किमती.

वाशिम जिल्हयात महत्वाच्या वस्तूंच्या सरासरी किरकोळ किमंती संकलीत करण्यासाठी नागरी भागाकरीता कारंजा व वाशिम हे दोन केंद्रे व ग्रामीण भागाकरीता मालेगाव हे एक केंद्र निवडण्यात आले आहे. नागरी केंद्रामार्फत जिवनावश्यक १२७ तर ग्रामीण केंद्रामार्फत जिवनावश्यक १०६ वस्तूंच्या दर आठवडयाला किमती संकलीत करण्यात येतात. या किमतीवर आधारीत ४७ अत्यावश्यक वस्तूंच्या त्रैमासीक सरासरी किमती तक्ता क्र.३.१ मध्ये देण्यात आल्या आहेत.

४. जमिन व इतर महसूल/स्थानिक स्वराज्य संस्थाचे उत्पन्न व खर्च/बँकिंग

जमिन महसूल

महसुल विभागामार्फत जमीन महसुल गोळा करण्यात येतो सन २०२४-२५ वर्षात महसुल वसुलीचे ३५४६६० शेतकरी खातेदार होते. वर्षाची एकत्रित वसुली रुपये १८७४.४६ लाख आहे. त्याचप्रमाणे खाणी, गौण खणीज व इतर किरकोळ महसुल वसुली रु. २९७७.१६ लक्ष करण्यात आली आहे.

४.१ नगर परिषद/नगरपंचायत उत्पन्न व खर्च.

जिल्हयामध्ये एकूण ४ नगर परिषद व २ नगरपंचायत कार्यरत असुन वाशिम आणि कारंजा नगरपरिषदा या ब वर्ग गटामध्ये तर रिसोड आणि मंगरूळपीर नगरपरिषदा क वर्ग गटामध्ये मोडतात. मालेगाव व मानोरा या दोन नगरपंचायत आहेत. जिल्हयातील सर्व नगरपरिषद/नगरपंचायतचे सन २०२४-२५ मध्ये उत्पन्न रुपये ३२४०८.३९ लाख ₹ व खर्च २३४५४.२४ लाख ₹होता. नगरपरिषदांचे कर हेच उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे.

४.२ ग्राम पंचायत उत्पन्न व खर्च .

जिल्हयामध्ये ४९१ ग्रामपंचायती कार्यरत आहेत. सर्व ग्रामपंचायतीचा एकत्रित विचार केला असता सन २०२४-२५ या वर्षी उत्पन्न ३४७२८.१० लाख ₹ आहे. तर खर्च २४०८८.१० लाख ₹ इतका आहे.

बॅकीग व विमा क्षेत्र

जिल्हयात २०२४-२५ अखेरीस वर्गीकृत बॅकांची शाखा कार्यालये ७६ आहेत. वर्गीकृत बँकांच्या ठेवी रुपये ५५०१५५.५९ लाख ₹ आहेत.जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाच्या ४५ शाखा असून त्यांचेकडे १४६४१४.८८ लाख ₹ च्या ठेवी आहेत.

जिल्हातील बचतगट

जिल्हयात स्थापन केलेला बचत गटांची संख्या १७०६२ इतकी आहे. पैकी खेळत्या भांडवलासाठी बँक जोडणी झालेले (फिरता निधी दिलेले) १०१८६ बचतगट असून ४४१३४ बचत गटांना बँकांमार्फत पतपुरवठा केलेला आहे. बँकांमार्फत ६९२६०.६१ लाख ₹ पतपुरवठा सदर बचतगटांना करण्यात आलेला आहे.

५. <u>कृषि व संलग्न सेवा</u>

५.१ जमिनिचा वापर

सन २०२४-२५ अस्थायी आकडेवारी नुसार वाशिम जिल्हयाचे एकुण भौगोलिक क्षेत्र ५१३०८३.६६ हेक्टर असुन यापैकी लागवडी लायक क्षेत्र ४८३१२१.८३ हेक्टर आहे. एकापेक्षा अधिक वेळा लागवडी खालील क्षेत्र १२२८९८.३० हेक्टर आहे.

वहितीखालील जमीनीचेधारण व त्याचे गटानुसार वर्गीकरण

वहितीखालील जमिन धारकाचे गटाप्रमाणे व भुधारकाच्या क्षेत्राची टक्केवारी २०१५ च्या कृषिगणने प्रमाणे वाशिम जिल्हयाची माहिती खालील तक्यात दर्शविण्यात आलेली आहे.

अ.क्र.	धारण गट	भुधारक	टक्केवारी	क्षेत्र	टक्केवारी
		२०१५-१६	२०१५-१६	२०१५-१६	२०१५-१६
१	२	३	४	५	६
१	१ हेक्टर पर्यत	८६०६२	३६.५५	५१८२४.८३	१३.५४
२	१ ते २ हेक्टर	९०७७९	३८.५५	१२७२०७.५०	३३.२४
३	२ ते ५ हेक्टर	५०४६५	२१.४३	१४२२४५.२६	३७.१६
४	५ ते १० हेक्टर	७२०७	३.०६	४८०५८.१४	१२.५५
५	१०ते २०हेक्टर	८८०	०.३७	११३२६.३१	२.९६
६	५० व त्यावरील	६३	०.०३	२१७८.५८	०.५७

५.२ पिक पध्दती

वाशिम जिल्हयात २०२४-२५ च्या अस्थायी आकडेवारीनुसार एकुण पिकाखालील जमीन ५४९९९२.२० हेक्टर असुन त्यापैकी ज्वारी पिकाखालील २५८८.६० हेक्टर, गहु या पिकाखालील ३८९८२ हेक्टर क्षेत्र आहे. तृणधान्ये ४२४७१.२० हेक्टर, कडधान्ये १५१३३०.७३ हेक्टर तसेच ज्वारी, कापुस आणि सोयाबीन ही मुख्य पिके कोरडवाहु जमिनीत घेतली जातात. बाकी रब्बी पिका पैकी गहु व हरभरा ही मुख्य पिके आहेत. या जिल्हयात ओलीताच्या सोयी कमी असुन कोरडवाहु पिकांचे प्रमाण जास्त आहे.

२०२४-२५ च्या अस्थायी आकडेवारी नुसार ओलीताखालील एकुण क्षेत्र १५७३२९.६० हेक्टर आहे. जिल्हयात साधारणपणे कापुस हे नगदी पिक असल्यामुळे बरेच शेतकरी कापुस हया पिकांची लागवड करतात. मात्र नगदी पिक म्हणून सोयाबिनच्या लागवडीच्या क्षेत्रात झपाटयाने वाढ होत आहे. ज्वारी हे मुख्य अन्न आहे व ज्वारी पिका पासून जनावरांना चारा मिळत असल्यामुळे या पिकाची लागवड जास्त असते.

५.३ वितरीत बियाणे व रासायनीक खतांचा वापर

जिल्हयात सन २०२४-२५ अखेर १२८२७० क्विंटल संकरीत व सुधारीत जातीच्या बियाण्याचे वितरण करण्यात आले .त्याचप्रमाणे ९६७५६ में.टन रासायनीक खतांचा वापरही करण्यात आला.

५.४ अन्नधान्य व मुख्य पिकांचे दर हेक्टरी उत्पादन

जिल्हयाचे सन २०२४ -२५चे मुख्य पिकांचे प्रति हेक्टरी उत्पादन खालील प्रमाणे आहे.गहू-१८५५.१३, खरीप ज्वारी-१०६९.३०, रबी ज्वारी- ८६०.६३ हरभरा-१०१४.१०, तुर-६७०.५९ मुग- १२०६.३६, उडीद-११९३.३८, सोयाबिन- १९१८.९५किलो आहे..

५.५ पशु वैद्यकिय सेवा

पशुधनाला होणा-या साथीच्या रोगावर प्रतिबंधात्मक उपचार उपलब्ध करुन देण्यासाठी शासनामार्फत पशुवैद्यकिय सेवा पुरविली जाते. जिल्हयातील पशुधनाच्या उपचारासाठी ४ पशुवैद्यकीय चिकित्सालय व ५८ पशुवैद्यकीय दवाखाने कार्यरत आहेत.

५.६ मत्यव्यवसाय

जिल्हयात मत्स्य संवर्धन पुर्णत: गोडया पाण्याखाली असुन १४५ लहान /मोठया जलाशयापासून २०२४-२५ मध्ये तलाव / धरणाखाली ७०८४ हेक्टर व ३१५ कि.मी. लांबीचे नदयांचे पात्र मत्स्य उत्पादनासाठी उपलब्ध होते. या पासून रुपये १९६६.८ लाख मुल्यांचे ६५५६ मे.टन मत्स्य उत्पादन झालेले आहे. यावर्षी ३८४.५ लाख मत्स्यबीज वापरण्यात आले. जिल्हयात मत्स्यउत्पादकांच्या १५३ मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था असून त्यांच्या सभासदांची संख्या ५२३९ इतकी आहे.

५.७ दुग्ध व्यवसाय

सन २०२४-२५ या वर्षात जिल्हयात २५ दुग्ध विकास सहकारी संस्था कार्यरत असून त्यांची एकुण सभासद संख्या ७२३ आहे.

५.८ सिंचन

वाशिम जिल्हयात सोनल व एकबुर्जी असे दोन मध्यम प्रकल्पाचे काम पुर्ण झालेले आहे. जिल्हयाचे एकुण सिंचनाखाली निवळ क्षेत्र २०२४-२५ मध्ये ६५७१३.४० हेक्टर इतके असुन सिंचनाखाली निवळ क्षेत्रापैकी विहिरीच्या पाण्याचे सिंचीत क्षेत्र सन २०२४-२५ नुसार ४५७०३.६५ हेक्टर इतके होते.

जिल्हयात सिंचनासाठी वापरात आलेल्या विहिरींची संख्या सन २०२४-२५ नुसार ४३५९० आहे व त्यापैकी ३७०२७ विहिरींवर विदयुत पंप बसविण्यात आले असुन त्याद्वारे सिंचन करण्यात येते.

५.९ सिंचन प्रकल्प

जिल्हयात एकही मोठा प्रकल्प नाही. २ मध्यम प्रकल्प, ७५ लघु सिंचन प्रकल्प (राज्य स्तर), १९० लघु सिंचन प्रकल्प (स्थानिक स्तर), १९० कोल्हापूरी बंधारे आहेत.

५.१० निरनिराळया पिकांखाली ओलीतांचे क्षेत्र

२०२४-२५ च्या अस्थायी आकडेवारी नुसार ओलीता खालील एकुण क्षेत्र १५७३२९.६ हेक्टर असुन त्यापैकी सर्वात जास्त ४६१६२ हेक्टर क्षेत्र मालेगाव तालुक्यात आहे.

५.११ वने

जिल्हयातील एकूण वन क्षेत्र ४३४.२२ चौ.कि.मी.असुन सदरील वन क्षेत्र पूर्णत: वनविभागाच्या अधिपत्याखाली आहेत. त्यापैकी ४०२.५६ चौ.कि.मी. वन क्षेत्र राखीव आहे. व ३१.६७ चौ.कि.मी.अवर्गीकृत वनक्षेत्र हे वनविभागाच्या अधिकारात आहे.

५.१२ वन उत्पादन

सन २०२४-२५ वर्षात वन उत्पादनापासून शासनास रुपये ५५.८८ लक्ष उत्पन्न झालेले आहे. त्यापैकी मुख्य वन उत्पादनापासुन रुपये १.९८ लाख व इतर गौण वन उत्पादनापासून रुपये ५३.९० लाख उत्पन्न झाले. जंगल विकास कार्यक्रमांतर्गत नविन झाडांची लागवड करुन वनांचा विकास करण्यात येत आहे.

५.१३ पशुधन

कृषि अर्थव्यवस्थेच्या विकासात पशुधन महत्वाची भुमिका बजावते. पशुगणना २०१९ च्या निष्कर्षानुसार जिल्हयात एकूण पशुधन ३६४८०४आहे. त्यापैकी १६६६९५ गाई व बैल, ५३८२६ म्हशी व रेडे , १३६८७० शेळ्या व मेंढ्या आहेत. शेतीला जोडधंदा मनाणून ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात पशुपालन व सोबत कुक्कुटपालनाचा व्यवसाय करण्यात येतो. उपरोक्त गणनेनुसार कुक्कुट पक्ष्यांची संख्या १२७०९५ इतकी आहे.

६ उद्योग व सहकार

६.१ खाणकाम व उद्योग

जिल्हयात प्रमुख खनिजे आढळून येत नाही. जिल्हयामध्ये नदीची रेती,मुरुम,गिटटी,रेती अशा गौण खनिजे उत्पादनापासून अल्प प्रमाणात महसूल प्राप्त होतो.

६.२ उद्योग आणि कामगार.

जिल्हयात सन २०२४-२५ मध्ये नोदणीकृत कारखानांच्या संख्या ७२ असुन त्यापैकी **७२** कारखाने चालू स्थितीत आहेत. चालू स्थितीत असलेल्या कारखान्यांमध्ये २१२२ कामगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

६.३ रोजगार

जिल्हयातील निरनिराळया उघोगातील सन २०२४-२५ मध्ये ११२०आस्थापना कडुन रोजगार विषयक माहिती प्राप्त झाली. त्यानुसार कामगांरांची संख्या १९१७८ असुन त्यापैकी शासकिय क्षेत्रात ५४७० कामगार व निमशासकिय क्षेत्रात ६०३१ व खाजगी क्षेत्रात ७६७७ कामगार आहेत.

६.४ रोजगार व स्वयंरोजगार विनिमय केंद्र

जिल्हयात स्वयंरोजगार केंद्राची निर्मिती १५/११/२००० रोजी झाली रोजगार व स्वयंरोजगार विनिमय केंद्रातील आकडेवारी सन २०२४-२५ मध्ये पटावरील अर्जदारांची संख्या ६५२७२ नोंदली गेलेली आहे. त्यापैकी १०८५ उमेदवारांना खाजगी क्षेत्रात नोकरी मिळाली होती . सेवायोजन केंद्राचा उपयोग करणा-यामध्ये सन २०२४-२५ मध्ये ११२० मालक होते.

६.५ सहकारी संस्था

जिल्हयात ३१/३/२०२५ अखेर एकूण १०५२ संस्था होत्या. त्यापैकी प्राथमिक कृषि सहकारी पतसंस्था ४२४, कर्मचारी पतसंस्था ६७, नागरी पतसंस्था ३१, पणन संस्था ७, बिगर कृषि पतसंस्था ११३, उत्पादक संस्था २५९, सामाजिक संस्था २४८ आहेत.

६.६ कृषि पणन

कृषि उत्पादनाच्या विक्री करीता जिल्हयामध्ये ६ कृषि उत्पन्न बाजार समित्या कार्यरत आहेत. त्या बाजार समित्यांचे ६ मुख्य बाजार व ८ उपबाजार पेठा आहेत.

७ पायाभूत सुविधा

७.१ विद्युत

जिल्हयामध्ये ४ शहर व ७८९ गांवे आहेत, त्यापैकी ३१ मार्च २०२५ पर्यत ४ शहरांचे व ७०५ गावांचे (८४ ओसाड गावे वगळून) विद्युतीकरणाचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे.

७.२ विजेचा वापर

२०२४-२५ मध्ये ७५०७९९.२० हजार किलो वॅट विजेचा वापर करण्यात आलेला आहे. त्यापैकी औद्योगिक उत्पादनासाठी २९१७६.१९ सार्वजनिक दिवाबत्ती साठी ११३३६.६८ व शेती व्यवसायासाठी ५३४२५३.९९ हजार किलो वॅट तास विजेचा वापर करण्यात आलेला आहे.

७.३ नोंदणी कृत वाहने.

३१/३/२०२५ अखेर नोंदणी केलेल्या वाहनांची संख्या ३१४५५६ असुन त्यामध्ये २७६४५३ प्रवासी वाहने आहेत तर मालवाहतुकीची साधने ३८१०३ इतकी आहेत व ट्रक्टरची संख्या १९४०३ इतकी आहे.

७.४ वाहतुक व दळणवळण

लोहमार्ग

वाशिम जिल्हयातील ५१ कि.मी. लांबीच्या मिटरगेज मार्गाची नुकतेच ब्रॉडगेज मार्गामध्ये रुपांतर करण्यात आले असून या मार्गामुळे अकोला व हिंगोली हे जिल्हे जोडले गेले आहेत.

रस्त्यांची लांबी

३१/३/२०२५ रोजी जिल्हयात एकूण ३६९७.३० कि.मी.लांबीचे रस्ते होते. त्यापैकी प्रमुख जिल्हा मार्गाची लांबी १११८.२३ कि.मी. व इतर जिल्हा मार्ग लांबीचे मार्ग ९१०.४४ कि.मी.रस्ते होते. जिल्हयातून १४६.१५ कि.मी. चा राष्ट्रीय महामार्ग गेलेला आहे. यापैकी डांबरी रस्ते २७२०.४३ कि.मी. व खडीचे रस्ते ३७१.२५ कि.मी.आहेत.

७.५ टपाल व तार सेवा

३१/३/२०२५ अखेर जिल्हयात १०६ टपाल कार्यालये व १४५ पत्रपेटया असुन १२८ पोस्टमन कार्यरत आहेत. पोस्टाची सुविधा असलेली गांवे १०६ असुन सार्वजनिक (पीसीओ) दुरध्वनीची संख्या ०२ आहे. तर (बिएसएनएल) वैयक्तिक दुरध्वनींची संख्या ११८७ इतकी आहे

८. सामाजिक क्षेत्र व सामुहीक सेवा

८.१ शिक्षण

शैक्षणिक संस्था व विघार्थ्याची संख्या

जिल्हयात सन २०२४-२५ मध्ये ९७९ प्राथमिक शाळा, १८७ माध्यमिक शाळा , २०० उच्च माध्यमिक व कनिष्ठे महाविघालये होती. सन २०२४-२५ मध्ये विद्यार्थ्याची एकूण संख्या २२६६५४ होती. त्यापैकी प्राथमिक विद्यार्थी संख्या- ८४०५५, माध्यमिक- ४८१३४, उच्च माध्यमिक व कनिष्ठे महाविघालये -९४४६५ होती. तसेच शिक्षकांची संख्या एकूण ८३११ होती. त्यापैकी ३९९९ प्राथमिक, १६८६ माध्यमिक, २५५३ उच्च माध्यमिक शिक्षक आहेत.

८.२ सार्वजनिक आरोग्य सेवा.

आरोग्य सेवा

जिल्हयामध्ये सार्वजनिक आरोग्य सेवा अंतर्गत ९ रुग्णालये ११ दवाखाने व २७ प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत असुन आंतर रुग्णालयांसाठी एकूण ९०७ खाटांची सोय आहे. तर २३२ डॉक्टर व ३९२ परिचारिका आहेत. उपचार केलेल्या अंतर रुग्णा पैकी १७३४२९ पुरुष, २०१३० स्त्रिया, ३९७१२ मुले तर उपचार केलेल्या बाहय रुग्णापैकी १२२३४८९ पुरुष, ६२४७६१ स्त्रिया व ७५४९२० मुले होती.

कुटुंब कल्याण कार्यक्रम

जिल्हयामध्ये ३१/३/२०२५ रोजी एकूण ३६ कुटुंब नियोजन केंद्र कार्यान्वित होती. सदर कार्यक्रमांतर्गत निर्बिर्जीकरण केलेल्या व्यक्तींची संख्या ४२६२ होती. त्यापैकी ११ पुरुष शस्त्रक्रिया व ४२५१ स्त्रियांवरील शस्त्रक्रिया करण्यात आल्या. हा कार्यक्रम लोकसंख्येला आळा घालण्याच्या दृष्टीकोनातुन अत्यंत महत्वाचा आहे.

जन्म व मृत्युचे प्रमाण

चालु वर्षी जिल्हयात १११७४ जन्म व १६८४ मृत्युची नोंद करण्यात आली. एकूण मृत्यु पैकी अर्भक मृत्यु संख्या ४७ इतकी आहे.

८.३ एकात्मिक बालविकास सेवा योजना

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे मुलभुत उदिष्ट् सहा वर्षाखालील बालके, गर्भवती स्त्रिया, व स्तनदा माता, यांचे आरोग्य व पोषण स्थिती सुधारण्यासाठी तसेच शालेय पुर्व शिक्षणास उत्तेजन देणे हा आहे. या उदिष्टांतर्गत सहा सेवांचा समावेश करण्यात आला असुन त्या खालील प्रमाणे आहेत.

१. लसीकरण
२. पूरक पोषण आहार
३. आरोग्य तपासणी
४. संदर्भ सेवा
५. पोषण व आरोग्य शिक्षण
६.शालेय पुर्व शिक्षण

जिल्ह्यात २०२४-२५ मध्ये ११९५ अंगणवाड्या कार्यरत असून त्यापैकी १०७४ ग्रामीण तर १२१ नागरी अंगानवाड्या आहेत. या सर्व अंगणवाड्यांमध्ये दाखल केलेल्या बालकांची संख्या ६९४२४ आहे. जिल्ह्यातील ०-५ वयोगटातील एकूण मुलांची संख्या ६९४२४ आहे. त्यापैकी एकूण २८६० मध्यम कमी वजनाची मुले असून २८५ मुले तीव्र कमी वजनाची आहेत. त्यांची एकूण मुलांशी टक्केवारी अनुक्रमे ४.१७ % व ०.४२ % आहे.

८.४ सामाजिक न्याय

अनुसुचित जाती आणि अनुसुचित जमाती यांच्या कल्याणाकरिता शासनाकडून राज्याच्या योजनामध्ये जिल्हयाकरीता पुरेशी तरतुद करण्यात येते. २०११ च्या जनगणने नुसार जिल्हयात अनूसुचित जातीची लोकसंख्या २२९४६२ इतकी आहे. हे जिल्हयाच्या एकुण लोकसंख्येशी शेकडा प्रमाण १९.१७ इतके आहे. जिल्हयात अनुसुचित जमातीची लोकसंख्या ८०४७१ इतकी असुन त्याचे लोकसंख्येशी शेकडा प्रमाण ६.७२ इतके आहे. जिल्हयात ५८ मागासवर्गीय वसतीगृहा पैकी शासकीय ६, अनुदानीत ५२ वसतीगृहे आहेत. दलीत वस्त्यांची संख्या ११७८ व त्यामधील लोकसंख्या २६८७०० इतकी आहे.

विशेष सहाय्य

जिल्ह्यात संजय गांधी निराधार योजनांतर्गत ३५६२३ लाभार्थ्यांना अनुदान वाटप करण्यात आले. श्रावणबाळ सेवा योजनांतर्गत ५४१७९ लाभार्थ्यांना अनुदान वाटप करण्यात आले. इंदिरा गांधी राष्ट्रीय वृधापकाळ योजनांतर्गत १४०८८ लाभार्थ्यांना व राष्ट्रीय कुटूंब लाभ योजनांतर्गत २६५ लाभार्थ्यांना अनुदान वाटप करण्यात आले आहे.

रोजगार हमी योजना

रोजगार हमी योजना ही एक अत्यंत महत्वाची योजना आहे. यात काम करु शकणा-या प्रत्येक व्यक्तीला कामाची हमी हा योजनेचा मुख्य उद्देश आहे. सन २०२४-२५ मध्ये या योजनेवर १३९२९.१६ लाख रुपये खर्च झाले व त्याव्दारे ४३.६१ लाख मनुष्य दिवस निर्मिती झाली.

पोलीस

जिल्हयात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सन २०२४-२५ मध्ये एकुण ९६१ पोलीस कर्मचारी होते तसेच जिल्हयात एकूण १३ पोलीस ठाणे , ९ पोलीस चौकी व १० आऊट पोस्ट आहेत.

करमणूक व प्रेक्षणिय स्थळे

वाशिम जिल्हयात २०२४-२५ या वर्षामध्ये एकूण ५ कायमस्वरुपी चित्रपटगृहे चालु आहेत. १ जुलै २०१७ पासुन जी.एस.टी. लागु झाल्यामुळे करमणुक कराची वसुली बंद आहे.

प्रेक्षणिय स्थळे

जिल्हयातील वाशिम या शहरामध्ये प्रसिध्द बालाजी मंदिर असुन तालुका कारंजा मध्ये नृसिंह सरस्वती गुरुमंदिर आहे. तसेच तहसिल रिसोड येथील लोणी या गांवी श्री संत सखाराम महाराज संस्थान आहे. वाशिम जिल्हयात पद्मतीर्थ हे प्रेक्षणिय व प्रसिध्द तिर्थक्षेत्र आहेत.

वृत्तपत्रे व नियत कालीके

जिल्हयात सन २०२४-२५ मध्ये ८ दैनिक, १७ साप्ताहिक प्रकाशीत करण्यात येतात व हे सर्व मराठी भाषेतील आहेत.

आर्थिक गणना

२०१३ च्या सहाव्या आर्थिक गणनेनुसार जिल्ह्यात एकुण १५२७ कृषी आस्थापना व ३०९५४ बिगर कृषी आस्थापना आहेत.

पर्यटन आराखडा

जिल्हा नियोजन समिती , वाशिम यांनी मा. व्यस्थापकीय संचालक,महाराष्ट् राज्य विकास महामंडळ , मंबई यांचे पत्र क्रं. MTDC/Works/Eol/DLTP/२०१२/३२८ दि २० जानेवारी २०१२ अन्वये वाशिम जिल्यातील पर्यटन स्थळाची निवड करणे व प्रस्ताव तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे याबाबत नेमणुक करण्यात आलेल्या संस्थेकडुन वाशिम जिल्हा पर्यटन बृहत आराखडा तयार केला असुन सदर आराखडा दि. ०६/०४/२०१३ रोजी जिल्हा नियोजन समिती , वाशिम यांच्याकडुन मा.व्यस्थापकीय संचालक, महाराष्ट् राज्य विकास महामंडळ , मंबई. सादर करण्यात आला आहे.

दृष्टीक्षेपात जिल्हा

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - २०२५
दृष्टीक्षेपात जिल्हा

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा	महाराष्ट्र
(१)	(२)	(३)	(४)	(५)
एक	**प्राकृतिक रचना**			
१	भौगोलिक स्थान		**२०२४-२५**	
१.१	उत्तर अक्षांश	अंश	१९° ६१' -२१° १६'	१६° ४'-२२° १'
१.२	पूर्व रेखांश	अंश	७६°७' -७७°१४'	७२° ६'-८०° ९'
१.३	क्षेत्रफळ	हजार चौ. कि. मी	४.९	३०८
२	**प्रशासकीय रचना**		२०२४-२५	२०११
२.१	तालुके	संख्या	६	३५५ $
२.२	शहरे (गणना शहरांसह)	संख्या	४	५३४
२.३	वस्ती असलेली गावे	संख्या	६८७	४०,९५९
२.४	वस्ती नसलेली गावे	संख्या	१०२	२,७०६
	$ मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हयांमधील ३ तालुके वगळून			
दोन	**स्थानिक स्वराज्य संस्था**		**२०२४-२५**	**२०२४-२५ ***
१	महानगरपालिका	संख्या	०	२९
२	नगरपरिषदा	संख्या	४	२४७
३	नगरपंचायत	संख्या	२	१४७
४	कटकमंडळे	संख्या	०	७
५	पंचायत समित्या	संख्या	६	३५१
६	ग्रामपंचायती	संख्या	४९१	२७,७८२
	* राज्य निवडणुक आयोग यांच्या अहवालानुसार			
तीन	**लोकसंख्या (जनगणना-२०११)**		**जनगणना २०११**	**२०११**
१	ग्रामीण	हजार	९८६	६१,५५६
२	नागरी	हजार	२११	५०,८१८
३	एकूण	हजार	११९७	१,१२,३७४
४	पुरुष	हजार	६२०	५८,२४३
५	स्त्रिया	हजार	५७७	५४,१३१
६	स्त्री- पुरुष प्रमाण (स्त्रिया प्रती हजार पुरुष)	संख्या	९३०	९२९
७	अनुसूचित जातींची लोकसंख्या	हजार	२२९.४६	१३,२७६
७.१	एकूण लोकसंख्येशी प्रमाण	टक्के	१९.१७	११.८
८	अनुसूचित जमातींची लोकसंख्या	हजार	८०.४७	१०,५१०
८.१	एकूण लोकसंख्येशी प्रमाण	टक्के	६.७२	९.४

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा	महाराष्ट्र
(१)	(२)	(३)	(४)	(५)
९	लोकसंख्येची घनता (प्रति चौ.कि.मी.)	संख्या	२४४	३६५
१०	साक्षरतेचे प्रमाण		**जनगणना २०११**	**२०११**
१०.१	ग्रामीण	टक्के	८२.१७	७७.०१
१०.२	नागरी	टक्के	८८.२९	८८.६९
१०.३	एकूण	टक्के	८३.२५	८२.३४
१०.४	पुरुष	टक्के	९०.५५	८८.३८
१०.५	स्त्रिया	टक्के	७५.४८	७५.८७
१०.६	साक्षरतेमध्ये महाराष्ट्राचा देशात क्रमांक	क्रम संख्या	-	बारा
चार	**जिल्हा उत्पन्न अंदाज**			
१	**चालू किंमतीनुसार**		**२०२३-२४**	**२०२३-२४**
१.१	एकूण उत्पन्न (स्थूल)	₹ कोटी	१९७६०	४०५५८४७
१.२	दरडोई उत्पन्न (स्थूल)	₹	१५१९६१	३१९४७४
१.३	एकूण उत्पन्न (निव्वळ)	₹ कोटी	१७५२२	३५३७९६८
१.४	दरडोई उत्पन्न (निव्वळ)	₹	१३४७५४	२७८६८१
२	**स्थिर (२०११-१२) किंमतीनुसार**		**२०२३-२४**	**२०२३-२४**
२.१	एकूण उत्पन्न (स्थूल)	₹ कोटी	११९२९	२४३५२५९
२.२	दरडोई उत्पन्न (स्थूल)	₹	९१७३९	१९१८२२
२.३	एकूण उत्पन्न (निव्वळ)	₹ कोटी	१०४९९	२१०७५९७
२.४	दरडोई उत्पन्न (निव्वळ)	₹	८०७४५	१६६०१३
पाच	**वित्तीय समावेश**			
१	**प्रधानमंत्री जनधन योजना**		**२०२४-२५**	**२०२४-२५**
१.१	उघडण्यात आलेली एकूण खाती	संख्या	४३२३९२	३६३९२४२४
१.२	देण्यात आलेली एकूण रूपे कार्ड	संख्या	३१३४३१	२५६१५४४१
१.३	किमान शिल्कीची मर्यादा नसलेली खाती	संख्या	२२०१५	२८६७३४८
१.४	एकूण ठेवी	₹ लाख	१२८८०	१८०१०५३
२	**प्रधानमंत्री मुद्रा योजना**		**२०२४-२५**	**२०२४-२५**
२.१	**शिशु**			
१	मंजूर कर्ज	₹ कोटी	१४३.३४	८८८०.५२
२	वितरीत कर्ज	₹ कोटी	१४२.५८	८८५७.५६
३	लाभार्थी	संख्या	३८४०३	२४६०२०८
२.२	**किशोर**			
१	मंजूर कर्ज	₹ कोटी	२४०.२५	२२०२७.२८
२	वितरीत कर्ज	₹ कोटी	२३२.०१	२१७६२.८५
३	लाभार्थी	संख्या	२३०३५	१७८०७६६
२.३	**तरूण**			
१	मंजूर कर्ज	₹ कोटी	८८.११	२०४०४.१

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा	महाराष्ट्र
(१)	(२)	(३)	(४)	(५)
२	वितरीत कर्ज	₹ कोटी	८४.६	२०१४१.६१
३	लाभार्थी	संख्या	११९५	२२१८१७
२.४	**एकूण**			
१	मंजूर कर्ज	₹ कोटी	४७१.७	५१३११.९
२	वितरीत कर्ज	₹ कोटी	४५९.१९	५०७६२.०२
३	लाभार्थी	संख्या	६२६३३	४४६२७९१
	^ तरूण व तरूण प्लस एकत्रित माहिती			
सहा	**कृषि**		**२०२४-२५**	**२०२४-२५**
१	भौगोलिक क्षेत्र	हजार हेक्टर	५१३.०८	३०७५८.२
२	वनक्षेत्र	हजार हेक्टर	४०.६२	५१६२.९
३	वनक्षेत्राचे भौगोलिक क्षेत्राशी प्रमाण	टक्के	७.९२	१६.७८
४	शेतीला उपलब्ध नसलेली जमीन		**२०२४-२५**	**२०२३-२४**
४.१	बिगर- शेती वापराखालील जमीन	हजार हेक्टर	८.१६	१७७२
४.२	पडीत आणि लागवाडीलायक नसलेली जमीन	हजार हेक्टर	३४.२७	१९८४.९
४.३	एकूण	हजार हेक्टर	४२.४३	३७५६.९
५	पडीत जमिनीव्यतिरिक्त लागवड न केलेली इतर जमीन		**२०२४-२५**	**२०२३-२४**
५.१	कायमची कुरणे व चराउ कुरणे	हजार हेक्टर	उ.ना.	१४४९.२
५.२	झाडे-झुडपांखालील	हजार हेक्टर	उ.ना.	२७६.१
५.३	लागवडीलायक परंतु पडीत	हजार हेक्टर	४१.०१	१०११.२
६	पडीत जमीन		**२०२४-२५**	**२०२३-२४**
६.१	चालू पड	हजार हेक्टर	७.१९	१५२९.६
६.२	इतर पड	हजार हेक्टर	७.८३	१२१७.५
७	पिकांखालील क्षेत्र		**२०२४-२५**	**२०२३-२४**
७.१	निव्वळ पेरणी क्षेत्र	हजार हेक्टर	४२७.०९	१६३५४.३
७.२	दुसोटा /तिसोटा क्षेत्र	हजार हेक्टर	१२२.९	८३१३.१
७.३	एकूण पिकांखालील क्षेत्र	हजार हेक्टर	५४९.९९	२४६६६७.३
८	ओलिताखालील क्षेत्र / सिंचनाखालील क्षेत्र			
८.१	निव्वळ ओलित क्षेत्र	हजार हेक्टर	६५.७१	उ.ना
८.२	एकूण ओलित क्षेत्र	हजार हेक्टर	६५.०७	उ.ना
	*अस्थायी			
९	महत्वाच्या पिकांखालील क्षेत्र		**२०२४-२५***	**२०२४-२५ ***
९.१	तृणधान्ये	हजार हेक्टर	४२.४७	६९५३.०८७
९.२	कडधान्ये	हजार हेक्टर	१५१.३३	४९७९.०९
९.३	तेलबिया	हजार हेक्टर	३०५.७	३११.९७
९.४	ऊस(तोडणीक्षेत्र)	हजार हेक्टर	०.११	११६७.०४३
९.५	कापूस (रुई)	हजार हेक्टर	२९.३३	३९६३.०४२

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा	महाराष्ट्र
(१)	(२)	(३)	(४)	(५)
			२०२४-२५	**२०२४-२५**
१०	पर्जन्य (सरासरी)	मि.मी.	९४७	१०७५.३
११	**वहितीचे क्षेत्र**		२०१५-१६	२०१५-१६
११.१	क्षेत्र २ हेक्टरपेक्षा कमी	हजार हेक्टर	१७९.०३	९,२२०
११.२	क्षेत्र २ ते १० हेक्टर	हजार हेक्टर	१९०.३	१०,१२५
११.३	क्षेत्र १० हेक्टरपेक्षा जास्त	हजार हेक्टर	१३.५	१,१६२
	*** तृतीय पुर्वानुमानानुसार**			
सात	**अंशत: व पूर्णत:सिंचन क्षमता निर्माण झालेले पाटबंधारे प्रकल्प व त्यांखालील क्षेत्र**		**२०२४-२५**	**२०२२-२३**
१	मोठे पाटबंधारे प्रकल्प (मध्यम पाटबंधारे प्रकल्पांसह)	संख्या	०	८६
१.१	लाभक्षेत्र (निर्मित सिंचन क्षमता) (मध्यम पाटबंधारे प्रकल्पांसह)	हजार हेक्टर	०	३,१९४
२	मध्यम पाटबंधारे प्रकल्प	संख्या	२	२९८
२.१	लाभक्षेत्र (निर्मित सिंचन क्षमता)	हजार हेक्टर	५.५९	१,०००
३	लघु पाटबंधारे प्रकल्प (राज्यक्षेत्र)	संख्या	७५	३,३१३
३.१	लाभक्षेत्र (निर्मित सिंचन क्षमता)	हजार हेक्टर	४७.२८	१,३६७
४	लाभ क्षेत्रातील विहिरींद्वारे सन २०२४-२५ मधील सिंचन क्षेत्र	हजार हेक्टर	४५.७	१,३८६
	***अस्थायी**			
आठ	**पशुसंवर्धन**		**२०१९**	**२०१९**
१	एकूण पशुधन	हजार	३६४.८	३३,०८०
२	गो जातीय	हजार	१६६.७	१३,९९३
३	महिषवर्गीय	हजार	५३.८३	५,६०४
४	मेंढ्या व शेळ्या	हजार	१३६.८७	१३,२८५
५	कुक्कुटादी पक्षी	हजार	१२७.१	७४,२९८
६	एकूण दुग्ध उत्पादन	हजार लिटर	उ.ना.	१५,०४२
* इतर पशुधनासह (इतर पशुधन या बाबीमध्ये डुकरे,घोडे व शिंगरे, खेचरे, उंट व गाढवे यांचा समावेश करण्यात आला आहे.				
@ कुक्कुटादी पक्षी यामध्ये टर्की, क्वेल व इतर कुक्कुटपक्षी यांचाही समावेश करण्यात आला आहे.				
^ एकूण कुक्कुटादी पक्षी यांच्या संख्येमध्ये पोल्ट्रीफार्म मधील पक्षी समाविष्ट आहेत.				
नऊ	**सहकार क्षेत्र**		**२०२४-२५**	**२०२३-२४**
१	सहकारी संस्था	संख्या	१०५२	२२२,१५४
२	प्राथमिक कृषि सहकारी पतसंस्था	संख्या	४२४	२०,९६२
२.१	सभासद संख्या	हजार	१४२.११	६०,०००
२.२	दिलेली कर्जे	₹ लाख	१२४०.१	१,८६०,७९०
२.३	येणे कर्जे	₹ लाख	२६३.०५	२,१५७,४३०
३	सहकारी दुग्धसंस्था (संदर्भ वर्ष, ३१ मार्च अखेर)	संख्या	२५	१३,६३५
	*अस्थायी			

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा	महाराष्ट्र
(१)	(२)	(३)	(४)	(५)
दहा	**वीज**		**२०२४-२५**	**मार्च २०२४**
१	विद्युतीकरण झालेली गावे	संख्या	७०५	४१,९२३
२	वीज पुरवठा केलेले कृषी पंप संच	हजार	३७.०३	४,८६९
३	विजेचा वापर		२०२४-२५	२०२४-२५
३.१	घरगुती	दशलक्ष कि.वॅ.तास	१३८.९९	३७,२११
३.२	वाणिज्यिक	दशलक्ष कि.वॅ.तास	२५.७८	१६,३०२
३.३	औद्योगिक	दशलक्ष कि.वॅ.तास	२९.१८	६५,४५९
३.४	कृषि	दशलक्ष कि.वॅ.तास	५३४.२५	३८,४२८
३.५	इतर (रेल्वे,सार्व.पाणी पुरवठा, सार्व. दिवाबत्ती व संकीर्ण)	दशलक्ष कि.वॅ.तास	२२.६	८,८२५
३.६	एकूण	दशलक्ष कि.वॅ.तास	७५०.८	१६६,२२५ $
अकरा	**परिवहन व दळणवळण**		**२०२४-२५**	**३१ मार्च२०२४ अखेर**
१	रेल्वे मार्गाची एकूण लांबी	कि.मी.	५१	६,३११
२	रस्त्यांनी जोडलेली गावे		**२०२४-२५**	**३१ मार्च२०२१अखेर**
२.१	बारमाही	संख्या	७०३	४०,१२२
३	रस्त्यांची लांबी (पृष्ठांकित)		२०२४-२५	२०२४-२५
३.१	राष्ट्रीय महामार्ग	कि.मी.	१४६.१५	१८,३६६
३.२	राज्य महामार्ग (प्रमुख राज्य महामार्गासह)	कि.मी.	४७८.०८	३३,६१४
३.३	प्रमुख जिल्हामार्ग	कि.मी.	१११८.२३	७४,१७८
३.४	इतर जिल्हामार्ग	कि.मी.	९१०.४४	४३,२२९
३.५	ग्रामीण रस्ते	कि.मी.	१०३९.८	१५९,१३९
३.६	एकूण	कि.मी.	३६९७.३	३२८,५२६
	# राज्य महामार्गात प्रमुख राज्य महामार्गाचा समावेश आहे.			
	अस्थायी			
	$ कोकण रेल्वेच्या लांबीसह			
बारा	**नोंदणीकृत कारखाने व रोजगार**		**२०२४-२५**	**२०२४-२५**
१	नोंदणीकृत कारखाने	संख्या	७२	३९,५४१
२	नोंदणीकृत चालू कारखाने	संख्या	७२	३८,२५०
२.१	त्यांतील कामगार	संख्या	२१२२	३,४७४,२६०
			२०२४-२५	**३१मार्च २०२४**
३	नोंदणीकृत सहकारी साखर कारखाने	संख्या	१	१७२

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा	महाराष्ट्र
(१)	(२)	(३)	(४)	(५)
३.१	साखरेचे उत्पादन	लाख मे. टन	बंद	११०.१८
			२०२४-२५	**३१मार्च २०२४**
४	सहकारी सूत गिरण्या	संख्या	२	२१२
तेरा	**शासकीय कर्मचाऱ्यांचा सर्वंकष माहितीकोष (०१ जुलै, २०२४ रोजी भरलेली पदे)**		**१ जुलै २०२४**	**१ जुलै २०२४**
१	शासकीय	हजार	७.३३	७२४
चौदा	**शिक्षण क्षेत्र**		**२०२४-२५**	**२०२४-२५**
१	**प्राथमिक शिक्षण (१ ते ८ वी)**			
१.१	एकूण शाळा	संख्या	९७९	१०४,४९९
१.२	विद्यार्थी	हजार	८४.०६	१४,५०१
१.३	शिक्षक	हजार	४	४९१
१.४	विद्यार्थी-शिक्षक प्रमाण	संख्या	२१.०२	३०
२	**माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण (९ ते १२)**		**२०२४-२५**	**२०२४-२५**
१.१	एकूण शाळा	संख्या	३८७	२८,९८६
१.२	विद्यार्थी	हजार	१४२.६	६,३६२
१.३	शिक्षक	हजार	४.२४	२४६
१.४	विद्यार्थी-शिक्षक प्रमाण	संख्या	३३.६४	२६
३	**उच्च शिक्षण**		२०२४-२५	२०२४-२५
३.१	संस्था	संख्या	४९	४,२८८
३.२	एकूण विद्यार्थी	हजार	९.८९	१,०४०
४	**तांत्रिक व व्यवसाय शिक्षण**		**२०२४-२५**	**२०२४-२५**
४.१	व्यवसाय पदवी शिक्षण संस्था	संख्या	१	१००७
४.१	प्रवेश क्षमता	संख्या	५७१	२१०,२६६
४.२	व्यवसाय पदविका शिक्षण संस्था	संख्या	१	१०८२
४.२	प्रवेश क्षमता	संख्या	४३७	१५४९८७
४.३	शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था	संख्या	६	४१९
४.३	प्रवेश क्षमता	संख्या	१३००	९३,५३६
४.४	अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (विना अनुदानित)	संख्या	२	५८८
४.४	प्रवेश क्षमता	संख्या	३१६	५९,५२४
पंधरा	**सार्वजनिक आरोग्य**		**२०२४-२५**	**डिसेंबर २०२४**
१	रुग्णालये	संख्या	९	५१७
२	दवाखाने	संख्या	११	८५१
३	प्राथमिक आरोग्य केंद्रे	संख्या	२७	१,९३६
४	प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे	संख्या	१५९	१०,७६५
५	प्राथमिक आरोग्य पथके	संख्या	उ.ना.	१२१

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा	महाराष्ट्र
(१)	(२)	(३)	(४)	(५)
	# उपरोक्त माहितीमध्ये फक्त शासकीय आरोग्य संस्थांच्याच माहितीचा समावेश आहे			
सोळा	**आदिवासी कल्याणकारी योजना**		**२०२४-२५**	**२०२४-२५**
१	आदिवासी आश्रमशाळा (शासकीय व अनुदानित)	संख्या	उ.ना.	१,०५१
२	त्यांतील विद्यार्थी	संख्या	उ.ना.	४५६,४४७
सतरा	**मागासवर्गीयांसाठी कल्याणकारी योजना**		**२०२४-२५**	**२०२४-२५**
१	मागासवर्गीयांसाठी वसतिगृहे (शासकीय व अनुदानित)	संख्या	५८	२,८२९
२	त्यांतील विद्यार्थी	संख्या	२६१२	१४२,१२५
अठरा	**सार्वजनिक वितरण व्यवस्था**		**२०२४-२५**	**जून २०२४ अखेर**
१	रास्त भावाची दुकाने	संख्या	७७६	५१,६७३
२	पुरविलेला एकूण साठा		**२०२४-२५**	**ऑक्टोबर २०२४**
२.१	गहू	लाख टन	०.१३	१३८०२
२.२	तांदूळ	लाख टन	०.४७	२४४०२
			२०२४-२५	**ऑक्टोबर २०२४**
३	शासकीय गोदामे	संख्या	१६	१,१८६
४	साठवण क्षमता	हजार टन	१२.७३	८३४,७६०

जिल्हा योजनेचा आढावा

जिल्हा योजनेचा आढावा

जिल्ह्याच्या सर्वगीण विकासासाठी शासनाच्या विविध स्त्रोता मधून निधी दिला जातो. त्यापैकी जिल्हा वार्षिक योजना हा सर्वात मोठा स्त्रोत आहे व यासाठी जिल्हा नियोजन समितीची स्थापना करण्यात आली आहे. जिल्हा नियोजन समिती जिल्ह्याची वार्षिक योजना तयार करुन शासनास सादर करते व शासन त्यानुसार जिल्ह्याला विविध विकास योजनासाठी निधी उपलब्ध करुन देते.

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना.

सन २०२४-२५ ची जिल्हा वार्षिक योजनेंतगत प्रत्यक्ष जिल्ह्यासाठी अंतिम नियतव्यय ₹ २८२००.०० लाख मंजूर करण्यात आला. माहे मार्च २०२५ अखेर ₹ २७९७४.३ इतका खर्च करण्यात आला.या व्यतिरिक्त अनूसुचित जाती योजना, आदिवासी उप योजना, अंतर्गत जिल्हयाला निधी प्राप्त झाला. माहे मार्च २०२५ अखेर मंजूर नियतव्यय प्राप्त निधी व झालेल्या खर्चाचा तपशिल पुढील तक्यात देण्यात आला आहे.

जिल्हा वार्षिक योजना २०२४-२५

माहे मार्च २०२५ अखेर प्रगतीचा तपशील

(₹. लाखात)

बाब	**सर्व साधारण योजना**	**अनु. जाती योजना**	**ओ.टी.एस.पी. योजना**	**एकुण**
मंजूर नियरव्यय	२८२००.००	७७००.००	१३२१.११	३७२२१.११
माहे मार्च २०२५ अखेर खर्च	२७९७४.३	७७००.००	१३२१.११	३६९९५.४१
खर्चाची टक्केवारी	९९.२० %	१०० %	१०० %	९९.३९ %


DISTRICT WASHIM
CHANGE IN JURISDICTION 2001 - 2011
KILOMETRES
4 0 4 8
Area gained from Akola District.
Area lost to Akola District.
BOUNDARY, DISTRICT ...
INDIA
MAHARASHTRA
DISTRICT WASHIM
KILOMETRES
4 0 4 8 12 16 20 24
DISTRICT AKOLA
DISTRICT AMRAVATI
DISTRICT BULDANA
DISTRICT YAVATMAL
DISTRICT HINGOLI
To Amravati
From Achalpur
KAMARGAON
From Barshi Takli
From Barshi Takli
KARANJA
SH 72
To Yavatmal
R. Arani
To Akola
From Akola
SHELU KH
KINHIRAJA
MEDSHI
MSH
SH 71
MANGRULPIR
MUNGALA
MALEGAON
MALEGAON JAHANGIR
From Mehkar
MANORA
SH 69
To Digras
SHIRPUR
River Penganga
SH 67
WASHIM
RITHAD
WAKAD
RISOD
AINSING
Pus River
From Lonar
To Hingoli
To Pusad
Area in km² : 4901.19
Population : 1197160
No. of Tahsils : 6
No. of Statutory Towns : 4
No. of Census Towns : NIL
No. of Villages : 789
District Headquarters is also the Tahsil Headquarters.
M - Part of Mangrulpir Tahsil.
K - Part of Karanja Tahsil.
C. D. Bock Boundary is Co - terminus with Tahsil Boundary Excluding all Statutory Towns.
MSH: Major State Highway.
BOUNDARY, DISTRICT ...
" TAHSIL ...
HEADQUARTERS : DISTRICT, TAHSIL ...
MEDSHI
VILLAGES HAVING 5000 AND ABOVE POPULATION WITH NAME
URBAN AREA WITH POPULATION SIZE : I, II, III, IV, V & VI ...
SH 69
STATE HIGHWAY ...
IMPORTANT METALLED ROAD ...
RAILWAY LINE WITH STATION, BROAD GAUGE ...
RS
" " " " NARROW GAUGE ...
RS
RIVER AND STREAM ...

आलेख क्र. १
जिल्ह्याची लोकसंख्या
(जनगणनां २०११ नुसार)

आकडे-शेकडा प्रमाण



आलेख क्र. २
जिल्ह्यातील ग्रामिण व नागरी लोकसंख्येचे प्रमाण
(जनगणनां २०११ नुसार)

आकडे- शेकडा प्रमाण



आलेख क्र. ३
जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण
(जनगणनां २०११ नुसार)

आकडे- शेकडा प्रमाण



आलेख क्र. ४
जिल्ह्यातील स्त्री-पुरुष प्रमाण
(जनगणनां २०११ नुसार)



आलेख क्र. ५
जिल्ह्यातील अनुसुचित जाती/जमातीच्या लोकसंख्येची टक्केवारी
(जनगणनां २०११ नुसार)



भाग-२
सांख्यिकीय तक्ते

भाग - २
सांख्यिकीय तक्ते
पान क्र. ४१ ते २६६

निवडक निर्देशक

तक्ता क्र १.१ अ
जिल्ह्यातील विविध आर्थिक व सामाजिक बाबींचे निवडक निर्देशक

प्रकाशनाचे वर्ष : २०२५

जिल्हा : वाशिम

संदर्भ वर्ष : २०२४-२५

अ.क्र.	बाब	परिमाण	संदर्भ वर्ष								
			१९६०-६१	१९७०-७१	१९८०-८१	१९९०-९१	२०००-०१	२०१०-११	२०२०-२१	२०२३-२४	२०२४-२५
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)	(११)	(१२)
क्षेत्रफळ व लोकसंख्या											
१	क्षेत्रफळ	क्षेत्र चौ.कि.मी	११०००	११०००	११०००	११०००	५०९५	४९०१.१९	४९०१.१९	४९०१.१९	४९०१.१९
२	तालुके	संख्या	१३	१३	१३	६	६	६	६	६	६
